-: महाराष्ट्र शासन :-
उपनिबंधक, सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई
कार्यालय - मल्होत्रा हाऊस, ६ वा मजला, जी.पी.ओ. समोर, फोर्ट, मुंबई ४०० ००१
Email ID - gnwardmumbai@gmail.com

जा.क्र. मुंबई/उपनि/जी-एन/बी-१/कलम ७६/७०६ /२०२५ दिनांक -२७ /०७/२०२५

## महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम ७६ अन्वये आदेश

**वाचावे :-** १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७६ अन्वये तरतुद.
२) रामकुटीर को-ऑप हौसिंग सोसायटी लि.,या संस्थेचा दि. १९/०७/२०२५ रोजीचा प्रस्ताव.
३) शासन निर्णय क्रमांक :- सगृयो २०१८/प्र.क्र.८५/१४-स दि. ०४/०७/२०१९.

ज्याअर्थी, रामकुटीर को-ऑप हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं. १३३-बी,माहीम बाजार समोर, पोस्ट ऑफिस एल.जे.रोड, माहीम, मुंबई - ४०००१६ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, नियम १९६१ नुसार नोंदणी क्रमांक बीओएम/एचएसजी/१३६/१९६२ दिनांक २७/०३/१९६२ अन्वये नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था आहे. सदर संस्था या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात येते आणि सदर संस्थेचे कामकाज सहकार कायदा, नियम व मंजूर उपविधीतील तरतुदी नुसार चालविणे कायदेशीर रित्या संस्थेवर बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी, वाचावे क्र. २ अन्वये रामकुटीर को-ऑप हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं. १३३-बी,माहीम बाजार समोर,पोस्ट ऑफिस एल.जे.रोड, माहीम, मुंबई - ४०००१६ या संस्थेने विकासक निश्चित करणेकरीता प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करणे बाबत दिनांक २१/०७/२०२५ रोजी प्रस्ताव या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाचे अवलोकन करता, संस्थेच्या इमारतीचे व मिळकतीचे पुनर्विकास करावयाचे असून, या कामी शासन निर्णय दि. ०४/०७/२०१९ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही / पुर्तता करण्यात आली आहे, असे सदर प्रस्तावाचे अवलोकन केले असता दिसून येते. त्या नुसार संस्थेने केलेली कार्यवाही व् संबंधीत कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडून सादर केले आहे. तसेच, संस्थेच्या अंतिम विकासक हा या कार्यालयाने नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती आणि त्यांच्या समक्ष संस्थेच्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीत निवड करण्याची तरतूद संदर्भ क्र. ३ मधील शासन निर्णयात नमूद आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाकडून सभेस प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी अशी विनंती संस्थेने केलेली आहे. आणि,

ज्याअर्थी, वाचावे क्र. ३ मधील परिपत्रकाच्या अनुषंगाने संस्थेकडून इमारतीचे व मिळकतीचे पुनर्विकासकामी अंतीम विकासक निवडी सबंधीची बैठक प्राधिकृत अधिकाऱ्याच्या समक्ष घेण्याच्या पूर्वी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची निवड केलेली आहे. त्यानुसार संस्थेकडून निवीदा मागविण्यात आल्या आहेत. प्राप्त निवीदांचा तुलनात्मक तक्ता व्यवस्थापन सल्लागार यांनी तयार केला आहे. इमारतीचे व मिळकतीचे पुनर्विकासना बाबत आवश्यक ती कार्यवाही शासनाकडील दिनांक ०४/०७/२०१९ चे शासन निर्णय नुसार पुर्ण झालेली आहे. त्यामुळे संस्थेचा अंतीम विकासक निवडीसाठी प्राधिकृत अधिकारी यांचे समक्ष बैठक बोलावणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त वाचावे क्र.३ चे शासन निर्णय नुसार संस्थेने बोलविलेल्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीस हजर राहण्यास प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची तरतुद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७६ मध्ये नमूद असल्याने त्या बाबत कायदा कलम ७६ अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करणे आवश्यक आहे. आणि,

ज्याअर्थी, उपरोक्त वाचावे क्र. ३ मधील दि. ०४/०७/२०१९ चे शासन निर्णय महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७६ मधील तरतुद तसेच संबंधीत संस्थेकडून प्राप्त झालेला प्रस्ताव व त्यामध्ये नमूद करण्यात आलेली वस्तुस्थिती विचारात घेता संस्थेने अंतीम विकासक निवडीसाठी

अधिमंडळाच्या विशेष बैठकीस हजर राहण्यासाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक झाले आहे अशी माझी खात्री झाल्याने पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

## -: <u>आदेश</u> :-

मी, विजयसिंह गवळी, उपनिबंधक, सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई या द्वारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७६ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून **रामकुटीर को-ऑप हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं. १३३-बी,माहीम बाजार समोर,पोस्ट ऑफिस एल.जे.रोड, माहीम, मुंबई - ४०००१६** या संस्थेची उपरोक्त नमूद कारणास्तव विकासकाचे अंतीम निवडीसाठी संस्थेकडून बोलाविण्यात येणाऱ्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीस निबंधक कार्यालयाचा प्रतिनिधी म्हणून श्रीमती स्वाती सावंत सहकारी अधिकारी- श्रेणी -१ अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

बैठक बोलाविण्या कामी प्राधिकृत अधिकारी यांचे मानधन, प्रवास भत्ता सभेसाठी होणारा खर्च, व्हिडीओ रेकॉर्डीग खर्चासह संस्थेच्या निधीतून करण्याचे आदेश देत आहे.

सदर आदेश आज दिनांक२१/०७/२०२५ रोजी माझ्या सही व कार्यालयाच्या मुद्रेसह दिला आहे.

Sd/-

**( विजयसिंह गवळी )**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई**

**ठिकाण - मुंबई**
**दिनांक -२१/०७/२०२५**

**प्रत माहितीसाठी -**

१.चेअरमन/ सेक्रेटरी, रामकुटीर को-ऑप हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं. १३३-बी, माहीम बाजार समोर,पोस्ट ऑफिस एल.जे.रोड, माहीम, मुंबई - ४०००१६

२/- त्यांनी संस्थेची अधिमंडळाची विशेष बैठक बोलाविण्याची कार्यवाही प्राधिकृत अधिकारी यांचेशी संपर्क साधून त्यांचे सुचनेनुसार करावयाची आहे.

२) श्रीमती स्वाती सावंत, सहकारी अधिकारी श्रेणी-१ अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था,जी/एन विभाग, मुंबई

२/- त्यांनी उपरोक्त प्रमाणे बैठकीस उपस्थित राहून सभेच्या इतिवृत्त आणि व्हिडीओ रेकॉर्डीग सह बैठकीचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३) संग्रह

**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, जी/एन विभाग, मुंबई.**